# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्र.संगाबाअवि/१/१०९/१-१६९/२०२१ दिनांक - १५/०२/२०२१

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत मा. जिल्हादंडाधिकारी अमरावती यांचे आदेश**

संदर्भ - १) कार्यालयीन परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/२-१३३/२०२१ दि.०६/०२/२०२१

२) जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-२३३/२०२१ दि. १२/०२/२०२१

राज्यात कोरोना विषाणू(कोव्हीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच संदर्भ क्र २) अन्वये जिल्हादंडाधिकारी,अमरावती यांनी कोरोनाचा प्रादुर्भावचा धोका लक्षात घेता अमरावती शहरातील व अमरावती जिल्हातील सर्व महाविद्यालय दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश दिलेले आहे. आदेशाची प्रत सुलभ संदर्भाकरीता सोबत जोडलेली आहे. तरी संबंधीत महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**प्रत माहिती करीता सविनय सादर -**

१) सहसंचालक(उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती

२) सहसंचालक(तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता -**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

२) उपकुलसचिव(मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक अमरावती शहरातील व अमरावती जिल्हातील सर्व महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

~~उपकुलसचिव(आस्था)~~,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

K.Order.Word

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)
: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३
Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-233/२०२१

दिनांक :- 12/०२/२०२१

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २९/०१/२०२१
४. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- १९६/२०२१ दि. २९/०१/२०२१
५. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- ४४५/२०२० दि. २३/११/२०२०
६. या कार्यालयाकडील आदेश क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि- ४४५/२०२० दि. २३/११/२०२०

## आदेश

(यात्रा/धार्मिक उत्सव/ लग्न समारंभ/मिरवणूक/सार्वजनिक कार्यक्रमाबाबत)

ज्या अर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये अमरावती जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता संदर्भिय क्र. ३ च्या महाराष्ट्र शासन यांचेकडील सूचनापत्रात नमुद केल्याप्रमाणे संदर्भिय क्र. ४ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) (३) नुसार दिनांक ०१/०२/२०२१ ते २८/०२/२०२१ पर्यंत अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले आहे.

तथापी दिनांक ०१ फेब्रुवारी २०२१ पासून दिवसेंदिवस अमरावती जिल्हयातील कोरोना रुग्णांच्या संख्येमध्ये लक्षनिय वाढ होत आहे तसेच या संदर्भात केंद्रीय आरोग्य पथकाने नुकताच अमरावती जिल्हयाचा ३ दिवसीय दौरा केलेला आहे व त्या अनुषंगाने कोविड-१९ चा प्रार्दुभाव रोखण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.तसेच यापूर्वी संदर्भिय क्र. ५ च्या आदेशान्वये लग्न व इतर समारंभाकरीता ५० पेक्षा जास्त व्यक्तींना उपस्थित राहता येणार नाही याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहे तसेच संदर्भिय क्र. ६ अन्वये अमरावती जिल्हयातील आयोजित होणाऱ्या सर्व यात्रा, उत्सव, महोत्सव यांना परवानगी अनुज्ञेय राहणार नाही याबाबतचे आदेश पारीत करण्यात आले आहे. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये असलेल्या परिस्थितीचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

१. संदर्भिय क्र. ४ अन्वये अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता संचारबंदीचे आदेश पारीत करण्यात आले आहे त्यानुसार शहरी व ग्रामीण भागामध्ये पाच किंवा त्यापेक्षा जास्त लोकांनी, जमावाने एकत्र जमू नये असे सूचित करण्यात येत आहे.
२. सर्व प्रकारच्या वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक स्वरुपाच्या यात्रा, उत्सव, समारंभ, महोत्सव, स्नेहसंमेलने, सामुहिक कार्यक्रम, सभा, बैठका, मिरवणूका, रॅली, भाषणबाजी, उदघोषणा या सर्व प्रकारास पुढील आदेशापर्यंत प्रतिबंध घालण्यात येत आहे.
३. सार्वजनिक ठिकाणी वावर करतांना प्रत्येक नागरिकांनी मास्क परिधान करणे आवश्यक राहील तसेच सामाजिक अंतर (Social Distanding) च्या नियमांचे पालन करण्यात यावे.
४. यापुढे लग्नसमारंभाकरीता संदर्भिय क्र. ५ च्या आदेशानुसार फक्त ५० व्यक्तींनाच उपस्थित राहता येईल. लग्नसमारंभाकरीता सकाळी ९.०० ते रात्री १०.०० पर्यंत परवानगी अनुज्ञेय राहील तसेच लग्न समारंभामध्ये अमरावती जिल्हयातील सर्व बँड पथकांना बँड वाजविण्याकरीता सकाळी ९.०० ते रात्री १०.०० पर्यंत बँड वाजविण्याची मुभा राहील.
५. लग्नसमारंभाच्या नियोजित स्थळाव्यतिरिक्त इतर ठिकाणी गर्दी होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी तसेच सार्वजनिक ठिकाणी गर्दी होत असल्याचे आढळून आल्यास याबाबात पोलीस विभागाने त्यांचे स्तरावरुन नियंत्रण ठेवण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्या.

६. अमरावती जिल्हयातील सर्व धार्मिक संस्थांनी सुध्दा त्यांचे संस्थान/मंदीर/मस्जीद/चर्च व इतर धार्मिक संस्थानामध्ये गर्दी होणार नाही या अनुषंगाने नियोजन करुन सामाजिक अंतर (Social Distancing) च्या नियमांचे पालन होईल याबाबतच्या उपाययोजना संबंधितांनी त्यांच्या स्तरावरुन करण्यात याव्यात.

७. अमरावती जिल्हयातील सर्व बाजारपेठांमध्ये नागरिकांची गर्दी होणार नाही याबाबत स्थानिक प्रशासन (महानगरपालीका/नगरपरिषद/नगर पंचायत/ग्रामपंचायत) यांनी दक्षता घेऊन त्याबाबतच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना त्यांच्या स्तरावरुन करुन गर्दीस प्रतिबंध करावा.

८. अमरावती जिल्हयामधील इयत्ता ५ वी ते ९ पर्यंत असलेल्या सर्व शाळा, सर्व महाविद्यालये, सर्व प्रकारची खाजगी शैक्षणिक प्रशिक्षण केंद्रे, खाजगी शिकवणी वर्ग, कोचिंग क्लासेस ही सद्यस्थितीमध्ये दिनांक २८/०२/२०२१ पर्यंत बंद ठेवण्यात यावी. तदनंतर ती सुरु करण्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल. ऑनलाईन/दुरस्थ शिक्षण यांना परवानगी राहील व त्याला अधिक वाव देण्यात यावा.

९. अमरावती जिल्हातील दिवसेंदिवस वाढता कोरोना प्रादुर्भावाचा धोका लक्षात घेऊन तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनापत्रातील निर्देशांचे व या कार्यालयाकडील वेळोवेळी पारीत करण्यात आलेल्या आदेशातील सूचनांचे पालन करण्यात यावे.

१०. या आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास संदर्भिय क्र. ४ च्या आदेशान्वये प्राधिकृत करण्यात आले आहे.

उपरोक्त दिलेले सर्व निर्देश हे यापूर्वी संदर्भिय क्र. ४ अन्वये पारीत केलेल्या आदेशातील सर्व अटी व शर्ती, तरतुदींचे व आदेशांचे पालन करण्याच्या अधीन राहून, सामाजिक अंतर (Social Distancing) तसेच कोविड-१९ च्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपायोजनांच्या अनुषंगाने सदरचे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

(शैलेश नवाल)
जिल्हादंडाधिकारी अमरावती

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. उपविभागीय दंडाधिकारी -------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
७. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी -------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
८. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
९. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**

११/२

जिल्हादंडाधिकारी अमरावती